# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

जा.क्र.मप्रनि/आस्था/ब- 1092
कल्पतरु पॉईट, २ रा मजला,
सायन माटुंगा स्किम रोड क्र.८,
सायन सर्कल समोर, सायन (पूर्व)
मुंबई: ४०० ०२२.

दिनांक: 13 /०६/२०१३

## प रि प त्र क

मंडळातील प्रादेशिक व उप प्रादेशिक कार्यालयातील क्षेत्र अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत संबंधीत नियंत्रण अधिकारी, कार्यालय प्रमुख हे मुख्यालयाची परवानगी न घेता परस्पर अंतर्गत स्तरावर बदल करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. उदा. उप-प्रादेशिक कार्यालयातील क्षेत्र अधिकारी प्रादेशिक कार्यालयाकडे वर्ग करून घेणे किंवा प्रादेशिक कार्यालयाकडील क्षेत्र अधिकारी उप-प्रादेशिक कार्यालयाकडे वर्ग करणे.

या संदर्भात मंडळातील सर्व नियंत्रण अधिकारी/कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, त्यांच्या अखत्यारीतील कोणत्याही क्षेत्र अधिकाऱ्यांच्या नियुक्ती आदेशातील कार्यालयामध्ये (Posting) व त्यांच्या कार्यक्षेत्रात मुख्यालयाच्या मान्यतेशिवाय बदल करण्यात येऊ नये. अत्यावश्यक परिस्थितीत असे बदल करणे अपरिहार्य असल्यास १० दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी तो करण्यात येऊ नये, याची नोंद घ्यावी व त्याबाबत मुख्यालयास कळविणे आवश्यक राहील.

अशाप्रकारे क्षेत्र अधिकाऱ्यांच्या कामकाजात मुख्यालयाची परवानगी न घेता बदल करण्यात आल्याचे आढळून आल्यास संबंधीत नियंत्रण अधिकारी/कार्यालय प्रमुख यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

तसेच एखादया क्षेत्र अधिकाऱ्यांबाबत अशाप्रकारे अंतर्गत बदल करण्यात आल्यास, त्याबाबत संबंधीत कर्मचाऱ्याने मुख्यालयास तात्काळ कळविण्याची जबाबदारी संबंधीत क्षेत्र अधिकाऱ्याचीसुध्दा राहील, याची नोंद घ्यावी.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधीत समुचित शासन नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल, याची दखल घेण्यात यावी.

सदर परिपत्रक तात्काळ प्रभावाने अंमलात येत आहे.

( राजीव कुमार मित्तल,भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रत माहितीसाठी-

१. जल प्रदूषण निवारण अभियंता/हवा प्रदूषण निवारण अभियंता/प्रधान वैज्ञानिक अधिकारी
२. सहायक सचिव (तां)/मुख्य लेखा अधिकारी, मुंबई/वरिष्ठ विधी अधिकारी/वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी
३. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी,मध्यवर्ती प्रयोगशाळा,निर्मलभवन,महापे, नवी मुंबई/औरंगाबाद
४. कार्यकारी अभियंता, म. प्र. नि. मंडळ, मुंबई
५. प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय/मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/नवीमुंबई/ पुणे/नशिक/नागपूर/औरंगाबाद/कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर
६. उप-प्रादेशिक अधिकारी, मुंबई-१/मुंबई-२/मुंबई-३/मुंबई-४/ठाणे-१/ठाणे-२/तारापूर-१/ तारापूर-२/नवी मुंबई-१/नवीमुंबई-२/तळोजा/कल्याण-१/कल्याण-२/कल्याण-३/भिवंडी/ रायगड-१/रायगड-२/रायगड /महाड/कोल्हापूर/सांगली/रत्नागिरी/चिपळूण/पुणे-१/पुणे-२/ पिंपरी-चिंचवड/सातारा/सोलापूर/औरंगाबाद-१/औरंगाबाद-२/औरंगाबाद-३/नांदेड/नाशिक/ अहमदनगर/जळगाव-१/जळगाव-२/नागपूर-१/नागपूर-२/नागपूर-३/चंद्रपूर/अमरावती-१/ अमरावती-२/अकोला/परभणी/लातूर/भंडारा.
७. खाजगी सचिव, अध्यक्ष कक्ष, म. प्र. नि. मंडळ/खाजगी सचिव, सदस्य सचिव कक्ष,म.प्र.नि.मंडळ, मुंबई
८. संकेतस्थळ, पर्यावरण माहिती केंद्र, म. प्र. नि. मंडळ, मुंबई
९.परिपत्रक नस्ती- २०१३/मुख्य नस्ती- २०१३

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\trupti2010\circular.doc